**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ**
**साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५**
**दूरध्वनी : ०२०-२५५३४८६०** **ई-मेल : info@mahanhm.in**

जा.क्र.मराफऔवमं/क्षेत्रवि/रोपवाटीका/२३३९०/२०२०
पुणे-५, दि. २४ /०९/२०२०

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक (सर्व),**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

**विषय :- राष्ट्रीय कषि विकास योजना अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका योजनेबाबत.**

**संदर्भ :- कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.-फरोवा-२०२०/प्र.क्र.९७/१३-अे दि.९/९/२०२०**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, भाजीपाला उत्पादनाला प्रोत्साहन देऊन शेतक-यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका योजनेस राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत राबविण्यास शासनाने उपरोक्त संदर्भान्वये मान्यता देलेली आहे.या योजनेअंतर्गत याबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना तसेच जिल्हा व प्रवर्गनिहाय लक्षांक सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे. प्रवर्गनिहाय खातेदारांची संख्या लक्षात घेऊन जिल्हा स्तरावरुन तालुक्यास लक्षांक वाटप करावे व तसेच या कार्यालयास कळवावे. प्रत्येक तालुक्यात किमान एक रोपवाटीका उभारणी करणे बंधनकारक असल्यामुळे किमान एक लक्षांक प्रत्येक तालुक्यास देण्यात यावा.

उपरोक्तप्रमाणे काटेकोरपणे सुचनांचा अवलंब करुन कार्यवाही करावी.

**स्वाक्षरीत/-**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट राज्य फलोत्पादन आणि**
**औषधी वनस्पती मंडळ,पुणे**

प्रतः- १ हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर, तळेगाव दाभाडे
२.कृषि विज्ञान केंद्र,बारामती,
३.कृषि विज्ञान केंद्र,नाशिक,
४.कृषि विज्ञान केंद्र,जालना
५.कृषि महाविद्यालय,नागपुर
६.उद्यान महाविद्यालय,अकोला

# राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत
# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका योजना सन २०२०-२१

## मार्गदर्शक सुचना

- **प्रस्तावना-**

महाराष्ट्र राज्य हे फलोत्पादनामध्ये अग्रेसर असुन राज्यात मोठ्या प्रमाणात फळे व भाजीपाला पिकांचे व्यावसायिक पध्दतीने लागवड करुन उत्पादन घेतले जाते. तसेच त्याची निर्यातही मोठ्या प्रमाणत करण्यात येते. मागील २ ते ३ वर्षापासुन भाजीपाला पिकाचे निर्यातक्षम व विषमुक्त उत्पादन करण्याकडे शेतक-यांचा कल वाढत आहे. त्यामुळे भाजीपाला बियाणांच्या चांगल्या जाती व चांगली रोपे यांची मागणी वाढत आहे. त्यादृष्टीने नियंत्रित वातावरणामध्ये तयार झालेली किड व रोगमुक्त भाजीपाला रोपांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक तालुक्यात दर्जेदार किड व रोग मुक्त रोपे तयार करणा-या लहान रोपवाटीका उभारण्यास वाव आहे. याच उद्देशाने शासनाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका योजना नव्याने सुरु करण्यात आलेली आहे.सदर योजनेस कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.-फरोवा-२०२०/प्र.क्र.९७/१३-अे दि.९/९/२०२० अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

- **योजनेचे उद्देश**

१. भाजीपाला पिकांची दर्जेदार व किडरोग मुक्त रोपे निर्मिती करुन उत्पन्न व उत्पादनात वाढ करणे.

२. रोपवाटिकेमुळे स्थानिक शेतक-यांना शेतीपुरक व्यवसायाची संधी उपलब्ध करुन देणे.

३. पिक रचनेत बदल घडवुन आणणे व नविन तंत्रज्ञानाचा वापर करणे.

४.शेतक-यांचे आर्थिक उत्पन्न व भाजीपाला उत्पादनात वाढ करणे.

- **योजनेची व्याप्ती व उद्दिष्ट**

राज्यातील सर्व तालुक्यात रोपवाटीका स्थापन करण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे.सदर योजनेअंतर्गत ५०० लाभार्थी निवडीचे उद्दिष्ट ठरविण्यात येत आलेले आहे. प्रत्येक तालुक्यास किमान एक रोपवाटीका उभारण्याचे प्रस्तावित आहे. सोबत जिल्हानिहाय व प्रवर्गनिहाय लक्षांक सहपत्रीत केलेला आहे. जिल्हा स्तरावरुन तालुक्यास लक्षांक वाटप करतांना प्रवर्गनिहाय खातेदारांची संख्या लक्षात घेऊन वाटप करावे. प्रत्येक तालुक्यात किमान एक रोपवाटीका उभारणी करणे बंधनकारक असल्यामुळे किमान एक लक्षांक प्रत्येक तालुक्यास देण्यात यावा. जिल्हा मुख्यालय असलेल्या तालुक्यांना लक्षांक वाटतांना प्राधान्य द्यावे.

- **लाभार्थी निवड**

१. अर्जदाराकडे स्वतःच्या मालकीची किमान ०.४० हे. जमिन असणे आवश्यक आहे. (७/१२)

२. रोपवाटीका उभारण्यासाठी पाण्याची कायमची सोय असणे आवश्यक आहे.

- **लाभार्थी निवडीचा प्राधान्यक्रम**

१. महिला कृषि पदवीधारकांना प्रथम प्राधान्य राहील.

२. महिला गट/महिला शेतकरी व्दितीय प्राधान्य राहिल.

३.भाजीपाला उत्पादक अल्प व अत्यअल्प भुधारक शेतकरी व शेतकरी गट यांना तृतिय प्राधान्य राहील.

- **पात्रतेचे निकष**

योजनेअंतर्गत रोपवाटीका पुर्णपणे नव्याने उभारावयाची आहे. या घटकाअंतर्गत यापुर्वी शासनाचा लाभ घेतलेले खाजगी रोपवाटीकाधारक, शासनाच्या लाभ न घेता उभारलेल्या खाजगी रोपवाटीकाधारक तसेच राष्ट्रीय कृषि विकास योजना, एकात्मिक फलोत्पादन अभियान, पोकरा किंवा इतर योजनातुन संरक्षित शेती (शेडनेट व हरितगृह ) घटकाचा लाभ घेतलेले लाभार्थी पुन:श्च सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र राहणार नाहीत.

- **समाविष्ट घटक**

टोमॅटो,वांगी,कोबी,फुलकोबी,मिरची,कांदा,इत्यादी व इतर भाजीपाला पिकांसाठी रोपवाटीकेची उभारणी करण्यात यावी.यामध्ये **रोपवाटीकेची उभारणी करवायाचे घटक व प्रति लाभार्थी महत्तम अर्थसहाय्याचे** स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

**(रक्कम रुपये)**

| **अ.क्र** | **घटक** | **क्षेत्र/संख्या** | **मापदंड (रु)** | **प्रकल्प खर्च** | **अनुदान रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३.२५ मी. उंचीचे Flat Type शेडनेट गृह (सांगाडा उभारणी) | १००० चौ.मी | ३८० प्रति चौ.मी. | ३,८०,००० | १,९०,००० |
| २ | प्लॉस्टिक टनेल | १००० चौ.मी | ६० प्रति चौ.मि | ६०,००० | ३०,००० |
| ३ | पॉवर नॅपसॅक स्प्रेअर | १ | ७,६०० | ७,६०० | ३,८०० |
| ४ | प्लास्टिक क्रेटस | ६२ | २०० | १२,४०० | ६,२०० |
| एकुण- | | | | **४,६०,०००** | **२,३०,०००** |

**सदर योजना प्रकल्प स्वरुपात राबवयाची असल्याने उपरोक्त चारही घटकांची एकाच ठिकाणी उभारणी करणे बंधनकारक राहील.अन्यथा प्रकल्प अनुदानास पात्र असणार नाही.**

- **योजनेची अमंलबजावणी**

**१. अर्ज करणे** - सदर योजने अंतर्गत इच्छुक शेतक-यांचे Maha DBT या संकेत स्थळावर ऑनलाईन किंवा तालुका कृषि अधिकारी यांचेकडे अर्ज करावेत.

**२. प्राधान्यक्रमाप्रमाणे सोडत प्रक्रिया करणे जेष्ठतासुची तयार करणे** :

**२.१** पात्र अर्जानुसार संबंधित शेतक-यांना सोडत प्रक्रियाबाबत अवगत करुन शेतक-यांच्या उपस्थितीत तालुकास्तरावर पात्र अर्जांची सोडत पध्दतीने प्रवर्गनिहाय जेष्ठतासुची तयार करावी.

**२.२** जेष्ठाता सुची प्राधान्य क्रमानुसार तयार करताना महा- डीबीटी वरील अर्ज व ऑफलाईन अर्ज यांची एकत्रितरीत्या सोडत काढण्यात यावी.

**२.३** अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीतील प्रवर्गासाठी निश्चित केलेला लक्षांक केवळ त्याच प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी वापरता येईल.

**२.४** लाभार्थी निवडीच्या प्राधान्यक्रमानुसार त्या त्या प्राधान्यक्रमाकांच्या प्रवर्गनिहाय स्वतंत्र जेष्ठतासूची तयार करण्यात यावी.

**२.५** प्रथम प्राधान्याच्या जेष्ठासुचितील संपुर्ण अर्ज संपल्यावरच दृितिय प्राधन्याच्या जेष्ठता सुचीवर कार्यवाही करावी. उदा. लक्षांक एक असताना चार अर्ज प्राप्त झाले तर प्रथम प्राधान्यक्रमातील महिला कृषि पदविधारका मधुन सोडतद्वारे एका महिला

कृषि पदवीधारकाची निवड होईल.जर महिला कृषि पदवीधारकांचे अर्ज नसतील तर महिला गट/महिला शेतकरी द्वितीय प्राधान्यक्रमातील महिला/महिला गटताची सोडतद्वारे निवड होईल. जर महिला शेतकरी/गट चे अर्ज नसल्यास भाजीपाला उत्पादक अल्प व अत्यल्प शेतकरी व शेतकरी गट यांना तृतीय प्राधान्यक्रमातील भाजीपाला उत्पादक अल्प व अत्यल्प शेतकरी व शेतकरी गटाची सोडतद्वारे निवड होईल. याबाबत अत्यंत काटेकोरपणे कार्यवाही करावी.

**३. पुर्वसंमती देणे**

तालुक्यास प्राप्त लंक्षाकानुसार सोबत सहपत्रीत केलेल्या प्रपत्रात स्थळ पाहणी करुन हमीपत्र घेतल्यावर लक्षांकाच्या आधिन राहुन पुर्वसंमती देण्यात यावी.

**३.१** पुर्वसंमती तपशिलाकरिता कार्यालयात स्वतंत्र दिलेल्या विहित नमुन्यात रजिस्टर ठेवण्यात यावे. यामध्ये तालुक्यास प्राप्त लंक्षाक व त्याप्रमाणे प्रवर्गनिहाय जेष्ठता यादी व दिलेली पुर्वसंमती याबाबतच्या दिनांकीत नोंदी असाव्यात.

**३.२** पुर्वसंमती पत्र देतेवेळी निवड झालेल्या शेतक-यांना तसेच ज्येष्ठता यादीतील पुढील शेतक-यांना कृषि सहाय्यक व मंडळ कृषि अधिकारी यांच्या समवेत तालुकास्तरावर बैठक बोलविण्यात यावी. सदर बैठकीमध्ये शेतक-याने पुर्वसंमती मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत काम सुरु करणे व ३ महिन्याच्या कालावधीत काम पुर्ण करणे आवश्यक आहे, याबाबत शेतक-यास अवगत करावे. तसेच रोपवाटीका शेडनेटगृह उभारणीमध्ये आवश्यक साहित्याचा तपशिल, तांत्रिक निकष याबाबत सविस्तर माहिती द्यावी. मार्गदर्शक सुचनेप्रमाणे आवश्यक साहित्यापैकी काही साहित्य वापरले नाही तर सदर प्रस्ताव अनुदान करिता विचारात घेतला जाणार नाही, याची शेतक-याला जाणीव करुन द्यावी. काम सुरु करण्यास शेतकरी इच्छुक नसल्यास तसे बैठकीमध्ये शेतक-याकडुन लेखी घ्यावे व त्याप्रमाणे जेष्ठता यादीतील क्रमानुसार पुढील शेतक-यास पुर्वसंमती देणेबाबत कार्यवाही करावी. पूर्वसंमती मात्र लक्षांकाच्या मर्यादेतच देण्यात यावी.

**३.३** तालुक्यास लंक्षाक प्राप्त झाल्यापासुन निश्चित केलेल्या कालावधीत सोबतच्या वेळापत्रकानुसार पुर्वसंमतीचा टप्पा पुर्ण करावा.

**३.४** पुर्वसंमतीनुसार कामे सुरु झाली आहेत की नाही याबाबतची मंडळ कृषि अधिकारी यांची शिफारस व काम सुरु करणेबाबत अनिइच्छुक शेतक-यांकडुन लेखी पत्रानुसार तालुका कृषि अधिकरी यांनी संबंधित शेतक-यांची पुर्वसंमती रद्द करावी. जेष्ठता यादीनुसार पुढील शेतक-यांना पुर्वसंमती देणेबाबत कार्यवाही करावी. याप्रमाणे पुर्वसंमतीचा पुढील टप्पा राबवावा.

**३.५** लंक्षाकाप्रमाणे पुर्वसंमती प्रदान करणे, रद्द करणे व नव्याने पुर्वसंमती देणे याबाबत काटेकोर अंमलबजावणी करवी.

**शासनाने सदर रोपवाटीकेचा प्रकल्प राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या धर्तीवर राबविण्यास मान्यता दिलेली असल्याने प्रकल्प स्थळांची स्थळ पाहणी,पुर्व संमतीबाबतची कार्यवाही, काम पुर्ण करण्याचा कालावधी, उभारणी साहित्याचा तपशील, तांत्रीक निकष, मोका तपासणी, अनुदान परीगणना, शेडनेटची कामे गुणवत्तापुर्ण होण्याच्या दृष्टिने अवलंब करावयाची कार्यपध्दती, मापनपुस्तीका नोंदणी,देयक नमुना, याबाबत या कार्यालयाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना पत्र क्र.मराफऔवमं/सं.शेती मार्गदर्शक सुचना/२०७६ दि. ५/९/२०१९ प्रमाणेच राहतील.**

- **रोपवाटीका उभारणीच्या सुचना**

**१. शेडनेटगृह**

सदर भाजीपाला रोपवाटीकेसाठी १००० चौ.मी चे ३.२५ मी. उंचीचे Flat Type ६ मी x ६ मी ग्रीडचे शेडनेट उभारवायचे आहे. यामध्ये संदर्भीय मार्गदर्शक सुचनेनुसार ६ मी x ६ मी ग्रीडचे Flat Type ३.२५ मि.उंचीचे १०१२ चौ.मी. चे शेडनेटचे साहित्य, पाया उभारणीचे बांधकाम साहित्य, मजुरी वाहतुक खर्च व जीएसटी ग्राह्य धरुन रक्कम रु. ३८० प्रति स्वेअर मिटर या प्रमाणे रक्कम रु. ३.८० लाख प्रकल्प खर्च अनुज्ञेय राहिल.मोका तपासणी प्रमाणे ५० टक्केनुसार महत्तम रक्कम रु. १.९० लाख अनुदान अनुज्ञेय राहिल. प्रकल्प स्थळांची स्थळ पाहणी, पुर्व संमतीबाबतची कार्यवाही, काम पुर्ण करण्याचा कालावधी, उभारणी साहित्याचा तपशील, तांत्रीक निकष, मोका तपासणी, अनुदान परीगणना, शेडनेटची कामे गुणवत्तापुर्ण होण्याच्या दृष्टिणे अवलंब करवायाची कार्यपध्दती, मापनपुस्तीका नोंदणी,देयक नमुना, याबाबत या कार्यालयाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना पत्र क्र.मराफऔवमं/सं.शेती मार्गदर्शक सुचना/२०७६ दि. ५/९/२०१९ प्रमाणेच राहतील.

**२. प्लॉस्टिक टनेल**

यामध्ये १००० चौ.मि. चे प्लॉस्टिक टनेल उभारावयाचे आहे.याबाबत तांत्रीक निकष या कार्यालयाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना पत्र क्र.मराफऔवमं/सं.शेती मार्गदर्शक सुचना/२०७६ दि. ५/९/२०१९ प्रमाणेच राहतील.

**३. पॉवर नॅपसॅक स्प्रेअर**

योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या पॉवर नॅपसॅक स्प्रेअर १२-१६ लिटर क्षमता, ०.७५ ते १.० एचपी व BIS प्रमाणकानुसार असावा. याबाबत अधिक माहिती तथा तांत्रीक निकषाबाबत SMAM योजनेच्या मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करावा.

**४. प्लास्टिक क्रेटस**

रोपवाटीकेसाठी घेण्यात येणारे प्लास्टिक क्रेट्स गुणवत्तापुर्ण असावेत.योजनेअंतर्गत रु. २०० प्रमाणे जास्तीत जास्त ६२ प्लास्टिक क्रेंट्स करीता रु. १२,४०० प्रकल्प खर्च ग्राह्य धरुन ५० टक्के रक्कम रु.६,२०० अनुज्ञेय आहे.

- **तांत्रिक प्रशिक्षण**

भाजीपाला रोपवाटिका लाभ घेऊ इच्छिणा-या लाभांर्थ्यांना तीन ते पाच दिवसांचे तांत्रिक प्रशिक्षण हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर,तळेगाव दाभाडे, कृषि विज्ञान केंद्र, बारामती, कृषि विज्ञान केंद्र,नाशिक, कृषि विज्ञान केंद्र,जालना, कृषि महाविद्यालय,नागपुर व उद्यान महाविद्यालय,अकोला येथे घेणे अनिवार्य राहील.सदर तांत्रिक प्रशिक्षणाचा खर्च एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातुन भागविण्यात येईल.

- **अर्थसहाय्याचे स्वरुप व Geo-tagging करणे**

१. उपविभागीय कृषि अधिकारी यांच्यामार्फत प्रकल्प उभारणीनंतर प्रथम मोका तपासणी करण्यात यावी. मोका तपासणीप्रमाणे अनुज्ञेय अनुदानाच्या ६० टक्के अनुदान प्रथम हप्ता (महत्तम रककम रु. १.३८ लाख) लाभार्थाच्या आधारलिंक बँक खात्यावर वितरीत करण्यात यावे. मोका तपासणीवेळी RKVY Bhuvan या पोर्टलवरॲपद्वारे रोपवाटीकेचे Geo-tagging करणे बंधनकारक राहिल. याबाबत सविस्तर सुचना राष्ट्रीय कृषि विकास शाखेकडुन देण्यात आलेल्या आहेत त्याचे तंतोतंत पालन करावे.

२. रोपवाटीकेतील रोपांची प्रत्यक्ष विक्री/उचल झाल्यावर मंडळ कृषि अधिकारी यांच्यामार्फम दृितिय मोका तपासणी करण्यात यावी.मोका तपासणीप्रमाणे अनुज्ञेय अनुदानच्या उर्वरित ४० टक्के अनुदान व्दितीय हप्ता (महत्तम रक्कम रु. ०.९२ लाख ) लाभार्थाच्या आधारलिंक बँक खात्यावर वितरीत करण्यात यावे.

- **रोपवाटीका परवाना**

  रोपवाटीकाधारकास "बियाणे कायदा १९६६" अंतर्गत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडुन परवाना घेणे बंधनकारक राहील.यासाठी लाभार्थ्याची निवड झाल्यावर तालुका कृषि अधिकारी यांनी परवाना घेणेबाबतच्या कार्यपध्दतीबाबत लाभार्थ्यांस मार्गदर्शन करावे. परवानाअभावी कोणताही लाभार्थी अनुदानापासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

- **रोपवाटीकेच्या दर्शनी भागावर लोखंडी फलक लावणे.**

  प्रकल्प स्थळी कायम स्वरुपी लोखंडी फलक (४ x ३ फुट) लोंखडी ॲगंलवर लावून त्यावर खालील नमुन्यात माहिती प्रदर्शित करावी.

कृषि विभाग लोगो | राफअ लोगो

**राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत**
**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका योजना**
**अर्थसहाय्यीत**

लाभार्थ्याचे नाव :----------------------------
गाव : ------------------------- तालुका :-------------------------
एकुण खर्च रक्कम : ---------------------------
अर्थसहाय्याची रक्कम : ----------------------------
परवाना क्रमांक..........
रोपवाटीकेची क्षमता -रोपे------------------प्रति महिना------------प्रति वर्ष
उपलब्ध रोपे संख्या
कांदा............... मिरची...............वांगी ............कोबी..........

वरीलप्रमाणे मार्गदर्शक सुचनांचा काटेकोरपणे अवलंब करावा.

**स्वाक्षरीत/-**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि**
**औषधी वनस्पती मंडळ,पुणे**

# अर्ज
## राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत
## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका योजना

**प्रति,**

**मा. तालुका कृषि अधिकारी,**

**-------------------------**

**विषय :-** राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर रोपवाटीका योजनेंतर्गत सन.................

या वर्षात ...............घटकाचा लाभ मिळण्याबाबत.

महोदय,

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका योजनेंतर्गत सन ............ मध्ये.................... या रोपवाटीका उभारणीकरीता अर्थसहाय्य मिळण्यासाठी अर्ज सादर करीत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे असून अर्थसहाय्य मिळण्याबाबत विनंती आहे.

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **लाभार्थ्याचे पूर्ण नाव** | .................................................................................................... | | | | | | | | | | | | |
| गाव | | पिन कोड | | | | | | | | | | | |
| तालुका | | मो.नंबर | | | | | | | | | | | |
| जिल्हा | | ई.मेल | | | | | | | | | | | |
| | | आधार नं. | | | | | | | | | | | |
| **लाभार्थी प्रकार** | ------------------ महिला कृषि पदवीधारक/महिला गट/महिला शेतकरी/ भाजीपाला उत्पादक अल्प व अत्यल्प भुधारक शेतकरी /भाजीपाला उत्पादक शेतकरी गट, इतर शेतकरी) | | | | | | | | | | | | |
| **लाभार्थी वर्गवारी** | ------------------- (अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/ सर्वसाधारण) | | | | | | | | | | | | |
| **प्रकल्प स्थळाचा पत्ता-** | सर्व्हे नं. --------------- (हिस्सा/ पोटहिस्सासह), गाव--------------------, तालुका----------------, जिल्हा-------------------, पिन कोड--------------- | | | | | | | | | | | | |
| **लाभार्थीच्या बँक खात्याचा तपशील** | बँकेचे नाव - | | | | | | | | | | | | |
| | शाखा - | | | | | | | | | | | | |
| | खाते नं.- | | | | | | | | | | | | |
| | आयएफएससी (**IFSC**) कोड- | | | | | | | | | | | | |

| **अर्जासोबत जोडलेल्या कागद पत्राचा तपशील -** (अर्जासोबत जोडलेल्या छायांकीत प्रती साक्षांकीत केलेल्या असाव्यात) | | | |
|---|---|---|---|
| **कागदपत्रे** | **होय/नाही** | **कागदपत्रे** | **होय/नाही** |
| ७/१२ चा उतारा | | बँक खाते पासबुक प्रथम पानाची छायांकीत प्रत | |
| ८-अ | | आधार कार्डची छायांकीत प्रत | |
| स्थळदर्शक नकाशा | | संवर्ग प्रमाणपत्र (अ.जाती/अ.जमाती शेतक-यांसाठी) | |
| चतु:सिमा | | हमी पत्र | |
| | | कृषि पदवी बाबतचे कागदपत्रे,महिला शेतकरी गट असल्यास त्याचे नोंदणी पत्र | |

**ठिकाण –**

**दिनांक -** **स्वाक्षरी :-**

**नाव :-**

## प्रपत्र-१

## स्थळ पाहणी अहवाल

**(कृषि सहाय्यक यांनी शेतक-यांच्या अर्ज प्राप्तीनंतर नियोजित प्रकल्प स्थळी व ८-अ मध्ये नमूद सर्व गट नं./सर्वे नं. मध्ये भेट देवून द्यावयाचा अहवाल)**

नाव व पत्ता-श्री./श्रीमती........................................................ ......... मु.पो. .........................

ता. .................. जि. ....................... आधार नंबर-.......

(**लाभार्थी प्रकार-** १. महिला कृषि पदवीधारक २.महिला शेतकरी/महिला गट ३.भाजीपाला उत्पादक अल्प व अत्यअल्प भुधारक शेतकरी ४. भाजीपाला उत्पादक शेतकरी गट ५. इतर.)

यांचे स्वतःच्या मालकीचे/शासकीय/निमशासकीय मालकीचे स.नं./गट नं....... मधील एकुण क्षेत्र ............(हे.आर.) पैकी ............... चौ.मी. क्षेत्रावर रोपवाटीका उभारणीसाठी अर्ज केलेला आहे. सदरच्या नियोजित प्रकल्प स्थळाची दि. ................... रोजी मी समक्ष जावून पाहणी केलेली असून प्रस्तावित प्रकल्प स्थळी रोपवाटीका उभारणीसाठी पाण्याची कायमची सोय **आहे/नाही.** शेडनेटगृह या घटकाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार शेडनेटगृह उभारणीसाठी जागा तांत्रिकदृष्टया योग्य **आहे/नाही.**

सदर प्रकल्प परिसरात भाजीपाला पिकाची लागवड **केली जाते/केली जात नाही**

उपरोक्त लाभार्थ्याने अर्जासोबत सादर केलेल्या ८-अ मध्ये नमूद इतर गट नं./ सर्वे न मध्ये पाहणी केलेली असून सदर गट नं/ सर्वे नं. मध्ये हरितगृह/शेडनेटगृह/रोपवाटीका अस्तित्वात **नाही.**

(स्वाक्षरी)

कृषि सहाय्यक

नावः-

सज्जा -

ता.:-

जि.:-

(कृषि सहाय्यक यांनी मार्गदर्शक सूचनेतील शेडनेटगृहासाठी जागेची निवड या बाबतच्या सविस्तर सूचनांचा अवलंब करुन उपरोक्त स्थळ तपासणी अहवाल द्यावा.)

## प्रपत्र-२

## राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत
## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका उभारणी हमीपत्र

मी/आम्ही श्री./श्रीमती............................................................आधार नंबर- मु.पो..................... ता....................जि.................... हमीपत्र लिहून देतो/ देते की,

१) मी यापुर्वी इतर कोणत्याही योजनेतुन खाजगी रोपवाटीका तसेच संरक्षित शेती (शेडनेट व हरितगृह)या घटकाचा लाभ घेतलेला नाही.

२) सन ------------ मध्ये मी/आम्ही ................चौ.मी. क्षेत्रावर रोपवाटीका उभारणीसाठी प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी, ............ यांचेकडे सादर करीत आहे/आहोत.

३) माझ्याकडे/आमच्याकडे कायमस्वरुपी सिंचन सुविधा तसेच विद्यूत पुरवठयाची सोय आहे.

४) मी/आम्ही संरक्षित शेती योजनेच्या शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना/तांत्रिक निकषानुसार प्रकल्प पूर्ण करील/करु.

५) रोपवाटीका शेडनेटगृहाचा दुरुपयोग होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी माझी/आमची राहील.

६) रोपवाटीका शेडनेटगृहाची नैसर्गिक आपत्ती अथवा इतर कारणांनी नुकसान झाल्यास शासनाकडे नुकसान भरपाई मागणार नाही.

७) मी/आम्ही रोपवाटीका शेडनेटगृह बाबतचे ३ ते ५ दिवसांचे प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाने निश्चित केलेल्या ठिकाणी व कालावधीत पूर्ण करेन व त्यानंतरच मी अनुदानास पात्र राहील याची मला जाणीव आहे.

८) अर्थसहाय्य मंजूर करणा-या अधिका-यांच्या पुर्वपरवानगी शिवाय मी/आम्ही संपुर्ण प्रकल्पाची किंवा त्याच्या काही भागाची जागा बदलणार नाहीत किंवा प्रकल्पाच्या लक्षणीय भागाची विल्हेवाट लावणार नाही.

९) प्रकल्पाच्या कामकाजाची कोणत्याही वेळेस तपासणी करणे व त्यासाठी प्रकल्पाच्या आवारात प्रवेश करणे यासाठी मला/आम्हास अर्थसहाय्य मंजूर करणारे अधिकारी, अनुदान अदा करणारे अधिकारी, राज्यशासन व त्यांनी प्राधिकृत केलेली व्यक्ती यांना प्रतिबंध करणार नाही तसेच त्यांनी या प्रकल्पाशी संबंधित कागदपत्रे, नोंदवह्या, पुस्तके व हिशोबाच्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी व त्याच्या प्रती देण्यास प्रतिबंध करणार नाही.

१०) यदाकदाचीत माझ्या/आमच्याकडून खोटी, चुकीची किंवा अपुर्ण माहिती दिल्याचे आढळून आल्यास, रोपवाटीका शेडनेटगृह घटक राबविण्याबाबतच्या योजनेअंतर्गत कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास तसेच दिलेल्या अनुदानाचा गैरवापर केल्याचे आढळून आल्यास मला/आम्हास माझे/आमचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर आवश्यकता भासल्यास मला/आम्हाला दिलेल्या अर्थसहाय्याची पूर्ण रक्कम अथवा त्याचा हिस्सा अर्थसहाय्य अदा केल्याच्या दिनांकापासून शासन निर्धारित करील त्या दराने व पद्धतीने वार्षिक व्याजासह वसूल करु शकतील याची मला/आम्हाला जाणीव आहे. त्याप्रमाणे मी/आम्ही ते अनुदान परत करु त्याबद्दल आमची काहीही तक्रार राहणार नाही.

११) शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या अटी व शर्ती माझ्यावर/आमच्यावर बंधनकारक राहतील याची मला/आम्हास जाणीव आहे व त्याचे मी/आम्ही पालन करीन/करु. प्रकल्पाच्या ठिकाणी विहीत नमुन्यात नामफलक लावून त्यावर ठळक अक्षरात **"राष्ट्रीय कृषि विकास योजना अर्थसहाय्यीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका"**असे नमूद करु याची मी/आम्ही हमी देतो.

१२) उपरोक्त योजनेतंर्गत मिळणा-या अर्थसहाय्याचा प्रकार हा प्रोत्साहनात्मक असल्यामुळे देय किंवा उपलब्ध होणारे अनुदान मला/आम्हास मान्य असेल व त्यासाठी मी न्यायालयात कोणत्याही प्रकारचा दावा दाखल करणार नाही.

१३) सदर योजनेअंतर्गत शासनाच्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे दोन टप्प्यात अनुदान मिळणार आहे. यामध्ये प्रकल्प उभारणीनंतर उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या मोका तपासणीनंतर प्रथम हप्ता ६० टक्के अनुदान (महत्तम रककम रु. १.३८ लाख) व उर्वरित व्दितीय हप्ता ४० टक्के (महत्तम रक्कम रु. ०.९२ लाख) अनुदान रोपवाटीकेतील रोपांची प्रत्यक्ष विक्री/उचल झाल्यावर माझ्या आधारलिंक बँक खात्यावर वितरीत होईल याची मला जाणीव आहे.

१४)सदर रोपवाटीकेकरीता "बियाणे कायदा १९६६" अंतर्गत परवाना घेणे बंधनकारक राहील याची मला जाणीव आहे.

१५) वरीलप्रमाणे सादर केलेली माहिती खरी व बरोबर असून ती खोटी व चुकीची आढळून आल्यास मला अदा करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची पूर्ण रक्कम अथवा त्याचा हिस्सा अर्थसहाय्य अदा केल्याच्या दिनांकापासून महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे, महाराष्ट्र राज्य निर्धारित करेल त्या दराने व पध्दतीने वार्षीक व्याजासह वसुल करू शकतील याची मला/आम्हास जाणीव असून ते माझ्या/आमच्यावर बंधनकारक राहील.

लाभार्थीची/ लाभार्थ्यांच्या स्वाक्षरी/ स्वाक्ष-या
(नाव व पत्यासह)

वरीलप्रमाणे सादर केलेली माहिती खरी आहे.

साक्षीदार क्र. १

नाव व पत्ता...................................................स्वाक्षरी.................

साक्षीदार क्र. २

नाव व पत्ता...................................................स्वाक्षरी.................

स्थळः-

दिनांकः-

(तालुका कृषि अधिकारी यांनी पूर्वसंमती पत्र देण्यापूर्वी लाभार्थ्यांकडून वरील नमुन्यात बंधपत्र भरुन घेवून मुळ प्रस्तावास जोडावे)

## प्रपत्र-३

## पूर्वसंमती पत्र

### राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका द्यावयाच्या पुर्वसंमती पत्राचा नमूना

जा.क्र. -----------------

कार्यालय — तालुका कृषि अधिकारी, ---

जिल्हा ----------

दिनांक - / /

प्रति,

श्री/श्रीमती--------------------------------------------------------------------------आधारकार्ड नंबर

मु.पो.-------------------- तालूका --------------------- जिल्हा --------------------

आपल्या दिनांक -------------- रोजीच्या अर्जाप्रमाणे आपले नावावर ८-अ प्रमाणे **...........** हे. क्षेत्र असून यापैकी सर्व्हे नं./गट नं. -------- मधील **..........** हे. क्षेत्रावर राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका अंतर्गत खालील बाबीनां पुर्वसंमती देण्यात येत आहे.

| **अ.क्र** | **बाब** | **आकारमान/संख्या** | **ग्राह्य प्रकल्प खर्च (रुपये)** | **महत्तम अनुदान(रुपये)** |
|---|---|---|---|---|
| १. | शेडनेटगृह | १००० स्वेअर मिटर ३.२५ उंचीचे फ्लॅट टाईप | ३,८०,००० | १,९०,००० |
| २. | पॉली टनेल | १००० स्वेअर मिटर | ६०,००० | रु.३०,००० |
| ३ | पॉवर नॅपसॅक स्पेअर | क्षमता १२-१६ लिटर ०.७५ ते १.० एचपी तसेच BIS प्रमाणकानुसार | ७,६०० | ३,८०० |
| ४. | क्रेटस | ६२ | १२,४०० | ६,२०० |
| **एकुण** | | | **४,६०,०००** | **२,३०,०००** |

सदरचे पूर्वसंमतीपत्र दिल्याच्या तारखेपासून **पंधरा दिवसाच्या आत आपण प्रकल्पाचे काम सुरु करावे.** पंधरा दिवसात प्रकल्पाचे काम सुरु न केल्यास आपणास दिलेली पूर्वसंमती रद्द करण्यात येईल. तसेच पुर्वसंमती प्राप्त झाल्यापासून तीन महिन्याच्या आत रोपवाटीकेचे काम पुर्ण करुन अनुदान मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी यांचे कार्यालयात सादर करावा. तीन महिन्याच्या आत काम पुर्ण न केल्यास व उशिराने प्रस्ताव सादर केल्यास आपणास अनुदान मागणीचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी. रोपवाटीका प्रकल्पात उपरोक्त चारही घटक उभारणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी. शासनाच्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे दोन टप्प्यात अनुदान मिळणार आहे. यामध्ये प्रकल्प उभारणीनंतर उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या मोका तपासणीनंतर प्रथम हप्ता ६० टक्के अनुदान (महत्तम रककम रु. १.३८ लाख) व उर्वरित व्दितीय हप्ता ४० टक्के (महत्तम रक्कम रु. ०.९२ लाख) अनुदान रोपवाटीकेतील रोपांची प्रत्यक्ष विक्री/उचल झाल्यावर आपल्या आधारलिंक बँक खात्यावर वितरीत करण्यात येईल.आपण उभारणी करु इच्छित असलेल्या भाजीपाला रोपवाटीकेतील १००० स्वेअर मिटर ३.२५ उंचीचे फ्लॅट टाईप शेडनेटगृह, पॉली टनेल उभारणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या साहित्याचे तांत्रिक निकष, अनिवार्य साहित्याची यादी व आराखडा सोबत जोडले आहे. उभारणीसाठी वापरावयाचे साहित्य सोबत जोडलेल्या तांत्रिक निकषाप्रमाणे व BIS मानांकित असेल तरच आपला प्रस्ताव अनुदानासाठी पात्र राहिल याची नोंद घ्यावी. आपला प्रस्ताव मंजूर झाल्यास आपणास शासन निर्णयानुसार (मार्गदर्शक सुचना व मंजूर मापदंड इत्यादी)

अनुज्ञेय अनुदान निधी उपलब्धतेनूसार मंजूर करण्यात येईल. तसेच सदरचे अनुदान आपल्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल. आपल्या प्रकल्प प्रस्तावास मंजूरी देणे, देय अनुदानाची रक्कम/देय कालावधी इत्यादी बाबी ठरविण्याचा अंतिम अधिकार शासनाचा राहिल. सदर रोपवाटीकेकरीता "बियाणे कायदा १९६६" अंतर्गत परवाना घेणे बंधनकारक राहील.

सोबतः

१. आराखडा (Design)
२. आकारमाननिहाय लागणारे साहित्य व खर्चाचे मापदंड
३. अनिवार्य साहित्याची यादी
४. General Specifications
५. नोंदणीकृत सेवा पुरठादारांची यादी
६. प्रशिक्षण संस्थांची नावे

तालुका कृषि अधिकारी,
जिल्हा ------------

## प्रपत्र-४

## रोपवाटीकेतील शेडनेटगृह प्रथम मोका तपासणी अहवाल

| **मंडळ कृषि अधिकारी** | |
|---|---|
| तपासणी दिनांक | |
| तपासणी करणा-या अधिका-याचे नाव | श्री./श्रीमती ------------------------------------------ मंकृअ,----------------------<br>सदस्य-------------------------------------- |
| लाभार्थ्याचे तपशिल | नाव : श्री./श्रीमती -------------------------------------------------------------<br>गावः--------, तालुका---------, जिल्हा-----------------सर्वे नं.---------------------<br>वर्गवारी (अ.जा./अ.ज./सर्वसाधारण).---------------------------- |
| बाब - शेडनेटगृह | १००० स्वेअर मिटर ३.२५ उंचीचे फ्लॅट टाईप |
| पूर्वसंमती क्र.व दिनांक | ------------------------- |
| **शेडनेटगृहासाठी पुरवठा करण्यात आलेल्या साहित्याची तपासणी** | |
| सेवा पुरवठादाराचा तपशिल | नाव,-------------------------<br>पत्ता-----------------------------------------------<br>दुरध्वनी क्र------------------, भ्रमणध्वनी क्र.-----------------------<br>सेवा पुरवठादार यांचा जिल्हास्तरीय नोंदणी क्रमांक-------------------------------------------- |
| शेडनेटगृहाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मॅाडेलनिहाय अनिवार्य साहित्याच्या यादीनुसार आवश्यकतेप्रमाणे साहीत्य पुरवठा केला आहे काय? **होय/नाही** | |

### जीआय पाईप्सचे तांत्रिक तपासणी तपशिल

**अ. जीआय पाईप्स - BIS Standared IS1161:2014 आहे काय?** **आहे/नाही**

| **अ. क्र.** | **पाईपचा व्यास** | | **पाईपची जाडी मि मी.** | | **वजन** | | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अपेक्षित | प्रत्यक्ष | अपेक्षित | प्रत्यक्ष | अपेक्षित | प्रत्यक्ष | प्रमाणित/ अप्रमाणित |
| १ | ६०.३ | | २.९ | | ४.११ | | |
| २ | ४८.३ | | २.९ | | ३.२५ | | |
| ३ | ४२.४ | | २.६ | | २.५५ | | |
| ४ | ३३.७ | | २.६ | | १.९९ | | |

### ब. शेडनेटगृहासाठी टेपनेट / मोनोनेट -

| **अ.क्र** | **तांत्रिक निकष** | | | | | | **होय/नाही** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **क** | **शेडनेटगृहासाठी टेपनेट (IS16008:2016) Part I आणि मोनोनेट (IS16008:2016) - Part II** | | | | | | **शेरा प्रमाणित / अप्रमाणित** |
| | टेपनेट - यु व्ही संस्कारित | | | मोनोनेट - यु व्ही संस्कारित | | | |
| | सावली गुणांक (टक्केवारी) | अपेक्षित वजन (ग्रॅम प्रति चौ. मीटर) | प्रत्यक्ष वजन (ग्रॅम प्रति चौ. मीटर) | सावली गुणांक (टक्केवारी) | अपेक्षित वजन (ग्रॅम प्रति चौ. मीटर) | प्रत्यक्ष वजन (ग्रॅम प्रति चौ. मीटर) | |
| | ३५ % | ८० | | ३५ % | ८९ | | |
| | ५० % | ९४ | | ५० % | ११८ | | |
| | ७५ % | ११३ | | ७५ % | २९० | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| **ड** | **शेडनेटगृहासाठी इनसेक्टनेट (IS16513:2016)** | | | | | | |
| | इनसेक्टनेट ३६ मेश यु व्ही संस्कारित | | इनसेक्टनेट ४० मेश यु व्ही संस्कारित | | इनसेक्टनेट ५० मेश यु व्ही संस्कारित | | |
| | अपेक्षित वजन (ग्रॅम प्रति चौ. मीटर) | प्रत्यक्ष वजन (ग्रॅम प्रति चौ. मीटर) | अपेक्षित वजन (ग्रॅम प्रति चौ. मीटर) | प्रत्यक्ष वजन (ग्रॅम प्रति चौ. मीटर) | अपेक्षित वजन (ग्रॅम प्रति चौ. मीटर) | प्रत्यक्ष वजन (ग्रॅम प्रति चौ. मीटर) | |
| | **९०** | | **१०५** | | **१२५** | | |
| **इ** | **शेडनेटगृहासाठी ॲपरॉन- यु व्ही संस्कारित लॅमिनेटेड ओव्हन पॉलिइथिलीन फिल्म आणि ॲल्युमिनीयम प्रोफाईल** | | | | | | |
| | **यु व्ही संस्कारित लॅमिनेटेड ओव्हन पॉलिइथिलीन फिल्म** | | | **ॲल्युमिनीयम प्रोफाईल** | | | |
| | अपेक्षित वजन (ग्रॅम प्रति मीटर) | | प्रत्यक्ष वजन (ग्रॅम प्रति मीटर) | अपेक्षित वजन (ग्रॅम प्रति मीटर) | प्रत्यक्ष वजन (ग्रॅम प्रति मीटर) | | |
| | **१००** | | | **१९०** | | | |
| **फ** | इतर साहीत्य मार्गदर्शक सूचनेतील तांत्रिक निकषाप्रमाणे आहे काय? | | | | | | **होय /नाही** |
| **ग** | शेडनेटगृहाची उभारणीची जागा व दिशा विचारात घेवून मार्गदर्शक सूचनेतील आराखडयाप्रमाणे उभारणी नियोजन (आरेखन) आहे काय? | | | | | | **होय /नाही** |
| | शेडनेटगृहाच्या पायासाठी घेण्यात येणारे खड्डयाची मापे योग्य आकारमानाचे आहेत काय? (पाया पक्का होण्यासाठी योग्य व्यासाचा फाउंडेशन पाईप, होल्ड फास्ट बार (८ मीमी जाडीचा), योग्य प्रमाणाचे कॉंक्रिट मिश्रणाने भरणे या बाबीकडे लाभार्थी शेतक-यांने विशेष लक्ष देणे बाबत तसेच शेडनेटगृहाचे आयुष्यमान व पक्क्या उभारणीकरीता पाया मजबुत असणे आवश्यक असलेबाबत लाभार्थ्यास मार्गदर्शन करावे.) | | | | | | **होय /नाही** |
